मुक्तागिरी

■ मंगळवार, दि. २८ डिसेंबर २०२१
www.emuktagiri.in



# सामाजिक जाणीवांचे प्रेरणा भवन : लोकनेते रामशेठ ठाकूर भवन

त्यांचे पूर्ण नाव राम चांगू ठाकूर.वडिलांचे नाव चांगू काना ठाकूर.रजिस्टर मध्ये त्यांच्या गावाचा उल्लेख गव्हाण'असा असून ते पनवेल तालुक्यात येते.पूर्वीचा कुलाबा जिल्हा.आज रायगड जिल्ह्यात हे गाव आढळते. त्यांची जन्मतारीख २ जून १९५१ अशी आहे. .श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय गव्हाण येथे त्यांचे मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण झाले. त्यानंतर त्यांनी छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे १५ जून १९६८ ला प्रवेश घेतला. कमवा आणि शिका मध्ये त्यांचे शिक्षण झाले.बी.ए.ला मराठी विषयात त्यांनी पदवी घेतली. पदवीला त्यांना सेकंड क्लास मिळाला. सातारा येथील पत्रकार दिनकर झिंब्रे यांनी साताऱ्यात आम्ही छत्रपती शिवाजी कॉलेजच्या विद्यार्थी वसतिगृहा दोन वर्षे राहत असल्याचे सांगितले. या कॉलेजमध्ये पदवीचे शिक्षण घेतल्यानंतर २४ -८-२०२१ रोजी त्यांचा टी.सी.शिवाजी विद्यापीठाकडे पाठविल्याची नोंद मिळते.टी.सी .क्रमांक ६६० आणि ६६१ हा शिवाजी विद्यापीठाकडे पाठविला आहे.तसेच मायग्रेशन प्रमाणपत्र देखील यावेळी पाठवण्यात आले आहे .या संदर्भीय माहितीनुसार १५-६ -१९६८ ते २४ -८ -१९७२ या चार वर्षाच्या काळात राम ठाकूर हे छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते. हा काळ त्यांच्या जडणघडणीत खूप महत्वाचा आहे,या काळातील साधी राहणी,समतेने राहणे,स्वावलंबी होणे ,संयमित जीवन जगणे ,गुरुजन यांचा आदर करणे,नैतिक दृष्ट्या चांगले आचरण करणे हे सारे त्यांना घराबरोबर या कॉलेजमध्ये मिळाले .ग्राउंडवर खेळलेले खेळ,मित्रांनी वडाच्या झाडाखाली बसून एकमेकांनी केलेल्या चर्चा, डॉ. द. ता. भोसले, डॉ. र. बा. मंचरकर प्रामा. के. यादव यांनी दिलेली व्याख्याने त्यांना अजून आठवतात, संतसाहित्याचा पेपर अजूनही डोळ्यात उभा राहतो. कमवा आणि शिका योजनेतील जीवन त्यांना आठवते.




कर्मवीर अण्णा ९ मे १९५९ साली ह्या जगातून निघून गेले.कर्मवीर अण्णा यांनी केलेल्या कामाने प्रभावित झालेले विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या संस्काराचे बळ त्यांना मिळालेले दिसते.समाजाभिमुख व्यक्तिमत्व म्हणून सर्वत्र रामशेठ ठाकूर यांचा उल्लेख केला जातो.महाविद्यालयीन जीवनात संस्कार घेण्यासाठी तेजिज्ञासू होते.वसतिगृहात असताना ताट वाजवत पण ओळीने जेवण घ्यायचे.शिवाजीराव भोसले यांची व्याख्याने ऐकण्यासाठी ते कराड, कोल्हापूर या ठिकाणी जात.प्राचार्य बापूसाहेब उनउने यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव त्यांचेवर होता. प्रा.नारायणराव भगरे ,प्रा.,आर.डी.गायकवाड हे इतिहास विषय शिकवीत होते तर प्रा.श्रीधर हेरवाडे मराठी विषय खूप चांगले शिकवत असत.

प्रा. डॉ.सुभाष वाघमारे
छ. शिवाजी कॉलेज, सातारा
मो. नंबर ९८९०७२६४४०

**उत्तरार्ध**

छत्रपती शिवाजी कॉलेजचे बी.ए .पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी प्रारंभी हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम केले. ३ वर्षे वाशीला शिक्षक म्हणून काम केल्यानंतर शिक्षक पेशा सोडून त्यांनी व्यवसायात प्रवेश केला.सुरवातीस १०-१२ हजाराची कामे मिळाली एक ट्रक,एक डंपर घेत कंत्राटदार म्हणून कामे केअली. १९७८ ला शिक्षकी क्षेत्र सोडले तरी त्यांनी गव्हाण हायस्कूलचे चेअरमन म्हणून जबाबदारी घेतली. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था त्यांनी स्थापन केली. शिक्षण क्षेत्रातले काम हे महत्वाचे काम त्यांना वाटले. रयत शिक्षण संस्थेतून त्यांना सर्वस्व ओतून काम करण्याची प्रेरणा मिळाली. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेद्वारे त्यांनी सुरवातीस इंग्रजी माध्यमांच्या शाळा काढल्या. गव्हाणला १ कोटी आणि १० लाख रुपये खर्च करून त्यांनी हायस्कूल बांधले. जनार्दन भगत यांच्यामुळे प्रेरणा मिळत गेली.. आपल्या वाट्याला गरिबीतून शिक्षण घेण्याचे भोग आले तरी इतर कोणाच्याही वाट्याला असे भोग येऊ नयेत या जाणीवेतून त्यांनी आजवरचे आयुष्य शैक्षणिक व सामाजिक प्रगतीसाठी दिले. .छत्रपती शिवाजी कॉलेजबद्दलची आपुलकी त्यांच्यामनात सतत आहे.पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता जनरल नॉलेज ,तंत्रज्ञान आणि सामाजिक मूल्यांची शिकवण शिक्षणात हवी असे त्यांना वाटते. बेरोजगार तरुणांना काम मिळावे यासाठी ते सतत ध्यास घेऊन काम करतात.नवीन कोर्सेस उपलब्ध करून देणे,समाजातील प्रश्न चर्चेने सोडवणे,उद्योगात गुंतवणुकीसाठी मार्गदर्शन करणे,यातून प्रगती साधली जाईल असा त्यांना विश्वास आहे. स्वतः च्या कर्तृत्वाने आदर्श नागरिक होणे, सहकार्य वृत्ती बाळगणे ही त्यांची आजीविका आहे. अशा रामशेठ ठाकूर साहेब यांची दातृत्व वृत्ती ही एक जबरदस्त प्रेरणा बनत. राहिली आहे.

कर्मवीर अण्णांच्या काळात जनतेने फार मोठी मदत रयत शिक्षण संस्थेस केली.अनेक मोठ मोठे राजे, व्यावसायिक, सामान्य जनता यांनीदेखील बहुजन शिक्षणासाठी जमिनी दिल्या.वाडे दिले.छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये ही उदात्त प्रेरणा रामशेठ ठाकूर साहेब या संवेदनशील माणसास मिळाली आणि त्यांनी आपल्या कॉलेजला ही भव्य इमारत बांधून दिली आहे. छत्रपती शिवाजी कॉलेज हे आता कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाशी संलग्न होत असताना सुरवातीलाच उभी राहिलेली ही इमारत अनेक पिढ्या घडवेल याची खात्री आहे.मला जेंव्हा ते मराठी विषयातून पदवी पास झाले



हे कळले तेंव्हा या मराठीतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याने संस्कार आणि कृतज्ञता ठेवून हे एवढे मोठे कार्य केले हे मराठी विभागाला अभिमान वाटेल अशीच घटना आहे.आज रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय शरदरावजी पवार साहेब यांच्या हस्ते त्यांचा सन्मान होताना मन भरून येत आहे. आदरणीय नामदार दिलीप वळसे पाटील यांना रयत शिक्षण संस्थेचा इस्माईलसाहेब मुल्ला जीवन गौरव पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला जात आहे. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम भरीव योगदान त्यांनी दिले आहे. या समारंभास रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील, व्हाईस चेअरमन अॅड.भगीरथ शिंदे, तसेच संस्थेचे सचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विठ्ठल शिवणकर, सहसचिव प्राचार्या डॉ.प्रतिभा गायकवाड, ऑडीटर प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे, माध्यमिक विभागाचे सचिव मा. संजय नागपुरे, रयत शिक्षण संस्थेचे कायदेविषयक सल्लागार अॅड. दिलावर मुल्ला आणि परिवार इत्यादी संस्थेचे सर्व पदाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित राहत आहेत. रयत शिक्षण संस्थेत शिकणाऱ्या अनेक गरीब मुलांच्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे जीवन मार्गदर्शक आहे. या पुढेही ते सत्कार्य करतच राहतील ७१ वर्षे पूर्ण होताना तितक्याच साधेपणाने कॉलेजला येऊन ते आपले स्वप्न पूर्ण करीत आहेत.त्यांनाही मनापासून सदिच्छा! लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणजे मला सामाजिक जाणीवेचा प्रेरणादायी निर्मळ झरा वाटतात, तर ही लोकनेते रामशेठ ठाकूर भवन ही इमारत म्हणजे मला कर्मवीरांच्या सामाजिक जाणीवेची येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शन करणारी दीपस्तंभ वाटते.

- समाप्त